नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
शासकीय कुटीर क्र.७, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४००० ०२१.
दूरध्वनी : ०२२-२२०४४९५२/२२०४५७०६ फॅक्स: २२८८६६६६
ई-मेल: clmms@yahoo.in; dclmms@yahoo.in ;
dclmms_complaints@yahoo.com

| | |
|---|---|
| क्र. वैमाश. मच्छिमार/आदेश/२०१४/ ८३९९ | दिनांक-२८नोव्हेंबर, २०१४ |

# आदेश

मच्छिमारांकडून मासळीची खरेदी व विक्री करतेवेळी जुन्या पद्धतीच्या तराजूचा वापर केला जात आहे या बाबत या कार्यालयाला मच्छिमार संघटनेतर्फे तक्रार देण्यात आली आहे. सदर तक्रारीबाबत संबंधितांशी चर्चा केल्यानंतर सदरची खरेदी, विक्री योग्य रित्या होण्यासाठी, महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ च्या नियम ४ मधील पोट नियम ४ अन्वये देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१. मच्छिमारांकडून मासे विकत घेणारे सर्व व्यापारी/खरेदीदार यांना सदरचे मासे विकत घेण्यासाठी वजन करते वेळेस वर्ग -३ अचुकतेच्या (Accuracy class-III) इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरणांचाच वापर करणे बंधयकारक राहिल.
२. निर्यातदारांनी मच्छिमारांकडून तसेच मासळी विक्रेत्यांकडून निर्यातीसाठी मासळी खरेदी करते वेळेस वजन करण्यासाठी वर्ग -३ अचुकतेच्या (Accuracy class-III) इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरणांचाच वापर करणे बंधयकारक राहिल.

सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधितांच्या विरुध्द महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ च्या नियम २३ प्रमाणे कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

-सही-

(संजय पाण्डेय)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.